# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## स्टेशन परिसरात हरविलेली बॅग मेट्रो प्रवाश्याला परत मिळाली

## ३.५ लाख किंमतीचे साहित्य होते बॅग मध्ये



नागपूर: महा मेट्रोच्या नागपूर मेट्रो सेवेमध्ये प्रामाणिकतेचा आणखी एक दखलपात्र आणि आदर्श ठरणारा प्रसंग नुकताच घडला. कॉटन मार्केट मेट्रो स्टेशन येथे तिकीट काउंटर येथे तिकीट खरेदी करतांना मेट्रो प्रवासी आपली बॅग तिथेच विसरला होता. सिक्युरिटी गार्ड श्री रोहन यांच्या लक्षात आल्यावर ती बॅग तात्काळ ताब्यात घेतली आणि नियमानुसार त्याने स्टेशन कंट्रोल रूम कडे धाव घेतली. स्टेशन कंट्रोलर ने बॅगवर लिहिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधत त्याची बॅग कॉटन मार्केट मेट्रो स्टेशन येथील कंट्रोल रूम मध्ये असल्याचे सांगण्यात आले.

मेट्रो प्रवासी श्री. रोहित मलानी  स्टेशन परिसरात आल्यानंतर ती बॅग त्याचीच असल्याची शहानिशा करत ती बॅग त्यांना सुपूर्द करण्यात आली सदर बॅग मध्ये रु. ३.५ लाख किंमतीचे साहित्य होते. आपली हरवलेली बॅग सुरक्षितपणे परत मिळाल्याने मेट्रो प्रशासनाचे तसेच कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानले.

उल्लेखनीय आहे कि काही दिवसापूर्वी प्रजापती नगर मेट्रो स्टेशनवर आलेल्या एका ट्रेनमध्ये श्रीमती बिना टेंभरे या प्रवासी महिलेची पर्स सापडली. त्या पर्समध्ये सुमारे ₹१ लाख किंमतीचे सोन्याचे दागिने आणि ₹४,००० रोख रक्कम होती. प्रवासादरम्यान त्या पर्स मेट्रोमध्येच विसरून स्टेशनवर उतरल्या होत्या. पर्समधील कागदांच्या आधारे संबंधित प्रवाश्याचा संपर्क साधला, सर्व आवश्यक कागदपत्रांची पुनर्तपासणी करण्यात आली. खात्री झाल्यानंतर, ही मौल्यवान पर्स श्रीमती टेंभरे यांच्याकडे सुरक्षितपणे परत करण्यात आली.

हा प्रसंग नागपूर मेट्रोतील कर्मचाऱ्यांची सचोटी, दक्षता आणि सेवाभाव अधोरेखित करणारा आहे. प्रवाशांच्या केवळ सुरक्षित प्रवासासाठी नव्हे, तर त्यांच्या वस्तूंच्या सुरक्षेसाठीही मेट्रो प्रशासन कटीबद्ध आहे, महा मेट्रो नागपूर यांना आपल्या कर्मचाऱ्यांचा अभिमान असून, भविष्यातही अशीच सेवा, प्रामाणिकता आणि विश्वास टिकवण्याची बांधिलकी महा मेट्रो घेत आहे.